# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. - ०२०- २५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळः- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे- ४११ ००७.

संदर्भ क्रमांक :- आरक्षण/ओ-२२/४७०

दिनांकः- २६/०५/२०१२

## परिपत्रक

**विषयः- प्राचार्य / संचालक / शिक्षक पदासाठी आरक्षण कक्ष, पुणे विद्यापीठ येथे केलेल्या नाव नोंदणीबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये / संस्थामध्ये प्राचार्य / संचालक / शिक्षक पदांसाठी पुणे विद्यापीठ पदव्युतर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर पदास लागणारी पात्रता धारण करीत असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांची आरक्षण कक्ष, पुणे विद्यापीठ येथे नाव नोंदणी करण्यात येते.

या कार्यालयात डिसेंबर, २०१० पूर्वी नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांच्या नोंदी रद्द करण्यात आलेल्या असून नव्याने नाव नोंदणी करण्यात येत आहे. या संदर्भात सर्व संबंधित उमेदवारांना या कार्यालयाचे पत्र क्र. आरक्षण/ओ-४५/३९, दि. २५/०१/२०१२ अन्वये स्वतंत्र पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे. तथापि, नाव नोंदणी रद्द झालेल्या ज्या उमेदवारांनी अद्यापही नव्याने नाव नोंदणी केलेली नाही अशा पात्र उमेदवारांनी दि. ०९ जून, २०१२ पर्यंत प्रत्यक्ष या कार्यालयात येवुन नाव नोंदणी करावी, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

सही/- २६/५/२०१२
सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

Sir/MD/2012/Circular